Phoenix Township LIMITED

CIN : L67190GA1993PLC001327

**Date: 15.02.2023**

To,
Department of Corporate Services,
Bombay Stock Exchange Limited, Mumbai
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400001.

**Ref: Scrip Code: 537839**

**Sub.: Submission of Newspaper Publications.**

Dear Sir /Madam,

Pursuant to Regulation 47 and other applicable Regulations of Securities and Exchange Board of India (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015, please find enclosed herewith the Newspaper publication of Unaudited Financial Results for the quarter and nine months ended 31st December, 2022 published in following Newspapers on Tuesday, 14th February , 2023.

1. Financial Express-English Newspaper

2. Dainik Herald-Marathi Newspaper.

This is for your kind information and record.

**Thanks & Regards,**

**For PHOENIX TOWNSHIP LIMITED**

KAVITA AKSHAY CHHAJER

Digitally signed by KAVITA AKSHAY CHHAJER
Date: 2023.02.15 12:37:07 +05'30'

**Kavita Chhajer**
**Company Secretary and Compliance Officer**


Corp. Office : Hede House, 2nd Floor., 14, BEST Marg, Colaba, Mumbai - 400 001. Tel. : ( 91-22 ) - 6159 0900 2283 1312, 2283 1325, Fax : ( 91-22 ) - 2202 8212 customerservice@hbgindia.com

Phoenix Park Inn Resort, Sequeira Vado, Candolim, Goa - 403515 Tel. : (91-832) 6633 333 Fax : (91-832) 6633 222 ppi@sarovarhotals.com

Dr. Malbaro House, Rua Ismael Gracias, Post Office Box No. 181, Panaji, Goa - 403 101 Tel.: (91-832) - 2228 217 Fax : (91-832) - 6641 261 E-mail : hbggoa@yahoo.co.in

REGD. OFF. : Durga Bhavan, Hede Centre, Tonca, Panaji, Goa - 403 001 Tel.: (91-832) - 6642 724/6453 265 Fax :(91-832) - 2461 394

## CLASSIFIED CENTRES IN MUMBAI

*Ambition Advertising,*
*Prabhadevi,*
*Phone : 24210792 / 94.*

*B. Y. Padhye Publicity,*
*Dadar (W),*
*Phone : 2422 9241/*
*2422 0445.*

*DATEY Advertising,*
*Datey Bhavan, Dadar (W)*
*Mobole : 8452846979/*
*9930949817*

*Central Advertising Agency,*
*Mahim (W),*
*Phone : 24468656 / 24465555*

*Charudatta Advertising,*
*Mahim (W),*
*Phone : 24221461*

*Jay Publicity,*
*Dadar (E),*
*Phone : 24124640*

*Pallavi Advtg.*
*Dadar (W),*
*Mobile: 9869109765*

*Shree Swami Samarth*
*Advertising,*
*Dadar (W),*
*Phone : 24440631*
*Mobile : 9869131962*

*Stylus Arts,*
*Dadar (W),*
*Phone : 24304897*

*Time Advertising,*
*Matunga (W),*
*Phone : 2446 6191*

*Vijaya Agencies,*
*Dadar (W),*
*Phone : 2422 5672.*
*Mobile : 9920640689*

*Space Age Advertising,*
*Bandra (E)*
*Phone : 26552207*
*Mobile : 9869666222*

*Kirti Agencies,*
*Khar (W),*
*Phone : 26047542.*

*AD Support Advertising,*
*Santacruz (W),*
*Mobile: 9869463650*

*Gauri Press Communication,*
*Vile Parle (E),*
*Phone : 2617 6310*
*Mobile: 9820069565*

*Carl Advertising,*
*Andheri (W),*
*Phone : 6696 3441 / 42.*

*Keyon Publicity*
*Andheri (E.)*
*Phone : 28253077*
*Mobile : 9920992393*

*Lokhandwala Advertising,*
*Andheri (W),*
*Phone : 26364274 /*
*26316960.*

*Prime Publicity Services,*
*Andheri (E),*
*Phone : 26839686 /*
*26830304.*
*ZOYA Creation*
*Andheri West*
*9833364551*

*P. V. Advertisers,*
*Jogeshwari (W)*
*Phone: 26768888*
*Mobile: 9820123000*

*Neha Agency,*
*Goregaon (E),*
*Phone : 2927 5033.*
*Mobile : 9819099563.*

*Shark Enterprises,*
*Goregaon (E),*
*Phone: 022-26863587*

*Adresult Services,*
*Goregaon (W)*
*Phone : 28762157 /*
*28726291.*

Classifieds — Making A Small Message Go A Long Way ..........


## PHOENIX TOWNSHIP LIMITED

**CIN : L67190GA1993PLC001327**
**Regd :** Durga Bhavan, Hede Centre Tonca Panaji Goa Ga 403001 IN
**Corp Office:** Balaji Bhavan, 2nd Floor, 14 Best Marg, Colaba, Mumbai- 400001
**Authorised Capital:** 28,00,00,000 **Paid-up Capital:**21,68,086,80 **Email :** complaince@hbgindia.com

**UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 31.12.2022**

(Rs. In Lacs)

| Particulars | 3 months ended 31.12.2022 (Un-Audited) | 9 Months Ended 31.12.2022 (Un-Audited) | Previous Year Ended 31.03.2022 (Audited) |
|---|---|---|---|
| Total Income from Operations(Net) | 793.804 | 1836.376 | 1587.88 |
| Net Profit/Loss from ordinary Activities after Tax | 13.415 | 74.540 | 28.656 |
| Net Profit/Loss for the period after Tax (after extraordinary Items) | 13.415 | 74.540 | 29.782 |
| Equity Share Capital | 1398.43 | 1398.43 | 1398.43 |
| Reserves(Excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of Previous Year) | 272.124 | 272.124 | 197.58 |
| Earning Per Share (before Extraordinary items) | 0.010 | 0.053 | 0.021 |
| Earning Per Share (after Extraordinary items) | 0.010 | 0.053 | 0.021 |

**Note**: The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the Stock Exchange websites. (URL of the filings)

**For Phoenix Township Limited**
**Sd/-**
**Samit Hede**
**Managing Director**
**DIN: 01411689**

**Place: Mumbai**
**Date: 13.02.2023**

## JAGJANANI TEXTILES LIMITED

**Regd. Office:** SCOs No. 33 and 34, RIICO Shopping Complex, Bagru Ext. 1, Bagru, Jaipur-303007.
**CIN:** L17124RJ1997PLC013498; **E-mail:** compliance@jagjanani.com; **Phone:** 0141-4104745

(₹ in '000')

| Particulars | 3 Months Ended 31-Dec-2022 | 3 Months Ended 31-Dec-2021 | Year Ended 31-Mar-22 |
|---|---|---|---|
| Total Income from Operations (net) | 440 | 0 | 1383 |
| Net Profit/(Loss) from ordinary activities after tax | 309 | (182) | 51226 |
| Net Profit/Loss for the period after tax (after Extraordinary items) | 309 | (182) | 51226 |
| Equity Share Capital | 156000 | 156000 | 156000 |
| Earning per share (after extraordinary items) | | | |
| (of ₹ 10/- each) (not annualised) Basic & Diluted | 0.020 | (0.011) | 0.002 |

**Note:** The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the Stock Exchange website, www.bseindia.com.

**FOR JAGJANANI TEXTILES LIMITED**

**Jaipur**
**13.02.2023**

**Nikhil Sharma**
**Company Secretary and Compliance Officer**

## ATLANTIC COMMERCIAL COMPANY LIMITED

Regd. Office: Unit No 2053, 2nd Floor, Plaza-II, Central Square, 20, Manohar Lal Khurana Marg, Bara Hindu Rao Delhi 110006
CIN: L51909DL1985PLC020372, Ph: 011-41539140
E-mail ID: limitedatlantic@gmail.com, Website: www.atlantic-commercial.com

EXTRACT OF STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE THIRD QUARTER AND NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2022

(₹ in Lakh, except per share detail)

| Sl. | Particulars | Quarter ended | | | Nine months ended on | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.12.2022 | 30.09.2022 | 31.12.2021 | 31.12.2022 | 31.12.2021 | 31.03.2022 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| 1 | Total income from operations | 3.21 | 3.38 | 1.20 | 9.02 | 3.93 | 5.33 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before tax, Exceptional and/or Extraordinary items) | 0.72 | 1.12 | 0.77 | 1.80 | 1.39 | 2.24 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 0.72 | 1.12 | 0.77 | 1.80 | 1.39 | 2.24 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 0.72 | 0.59 | 0.67 | 1.27 | 1.04 | 1.68 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 0.72 | 0.59 | 0.67 | 1.27 | 1.04 | 1.68 |
| 6 | Equity Share Capital | 73.50 | 73.50 | 73.50 | 73.50 | 73.50 | 73.50 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous period | - | - | - | - | - | 49.43 |
| 8 | Earnings per share (of ₹ 10/- each) (for continuing and discontinued operations) - 1. Basic (in ₹): 2. Diluted (in ₹): | 0.10<br>0.10 | 0.08<br>0.08 | 0.09<br>0.09 | 0.17<br>0.17 | 0.14<br>0.14 | 0.23<br>0.23 |

**Notes:** The above is an extract of the detailed format of Financial Results for the third quarter and nine months ended 31st December, 2022 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results for the third quarter and nine months ended 31st December, 2022 are available on the websites of the Stock Exchange (www.msei.in) and on the company's website (www.atlantic-commercial.com).

**For Atlantic Commercial Company Limited**
**Sd/-**
**Narendra Kishore Gaur**
**Chairman**
**DIN - 00168265**

**Place: New Delhi**
**Date: 13.02.2023**

## LEAD FINANCIAL SERVICES LIMITED

Regd. Office: 101, Sita Ram Mansion, 718/21, Joshi Road, Karol Bagh, New Delhi-110005
CIN L74140DL1993PLC053485

Statement of Unaudited Financial Results for the Quarter & Nine Months ended December 31, 2022

(Rs. in Lacs except per share data)

| S. No. | Particulars | Quarter Ended | | | Nine Months ended | | Year Ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.12.2022 (Reviewed) | 30.09.2022 (Reviewed) | 31.12.2021 (Reviewed) | 31.12.2022 (Reviewed) | 31.12.2021 (Reviewed) | 31.03.2022 (Audited) |
| 1. | Total income from operations | 23.35 | 0.69 | 3.61 | 24.64 | 10.91 | 430.51 |
| 2. | Net Profit/ (Loss) for the period (before tax and exceptional items) | 21.57 | (3.09) | (1.37) | 14.59 | (4.11) | 10.97 |
| 3. | Net Profit/ (Loss) for the period before tax (after exceptional items) | 21.57 | (3.09) | (1.37) | 14.59 | (4.11) | 10.97 |
| 4. | Net Profit/ (Loss) for the period after tax (after exceptional items) | 16.94 | (2.35) | (1.01) | 11.67 | (3.04) | 10.34 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax) | 16.94 | (2.20) | (0.99) | 11.58 | (2.63) | 10.57 |
| 6. | Paid-up Equity Share Capital (Face Value of Rs. 10/- each) | 330.00 | 330.00 | 330.00 | 330.00 | 330.00 | 330.00 |
| 7. | Other Equity | - | - | - | - | - | 222.06 |
| 8. | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (Not annualised) Basic : Diluted: | 0.51<br>0.51 | (0.07)<br>(0.07) | (0.03)<br>(0.03) | 0.35<br>0.35 | (0.09)<br>(0.09) | 0.31<br>0.31 |

**Note:** The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015 (as amended). The full format of the Quarterly Financial Results is available on the Stock Exchange Website i.e. www.bseindia.com and on Company's website i.e. www.leadfinancialservices.in.

**For and on behalf of the Board of**
**Lead Financial Services Ltd.**
**Sd/-**
**P.C Bindal**
**(Chairman)**

**Place: New Delhi**
**Date: February 13, 2023**



14-02-2023-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/13/2023 11:20 PM Page 1



## आजचे कार्यक्रम

● **कळंगुट** : श्री देव बाबरेश्वर जत्रोत्सवावेळी 'शुभटिंगल सावधान' नाटक. स्थळ : कळंगुट बाबरेश्वर मंदिर. वेळ : रात्री ९ वा.

● **चिंचोळे** : श्री क्षेत्र पिंपळेश्वर दत्त मंदिर ट्रस्ट वर्धापनदिनानिमित्त 'दीपोत्सव' कार्यक्रम. स्थळ : पणजी–चिंचोळे. वेळ : रात्रो ९ वा.

● **होंडा** : सातेरी केळबाय देव आकारी वंश देवतांचा वर्धापनदिनानिमित्त 'द्रौपदी वस्त्रहरण' नाट्यप्रयोग. स्थळ : गावकरवाडा, होंडा. वेळ : रात्रो ११ वा.

● **म्हापसा** : श्री देव राष्ट्रोळी, नीळकंठ, ब्राह्मण देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त 'करीन ती पूर्व' तीन अंकी नाटक. स्थळ : पेडे–म्हापसा. वेळ : रात्रो ८ वा.

● **तिसवाडी** : श्री चामुंडेश्वरी पंचायतन देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त 'भजन'. स्थळ : सुलाभाट आगशी. वेळ : रात्रो ९ वा.

● **वास्को** : श्री गोमतेश्वर ब्राह्मण देवस्थान सासमोळे बायणा वार्षिक उत्सवानिमित्त मुरगाव तालुका मर्यादित रांगोळी स्पर्धा. स्थळ : बायणा सासमोळे. वेळ : दुपारी २ वा.

● **म्हापसा** : महारुद्र आम्रेकरनाथ देवस्थानात महाशिवरात्री उत्सवानिमित्त पालखी मिरवणूक. स्थळ : पिळर्ण–बार्देस. वेळ : रात्री ९ वा.

## निवडक

### शिवोली वसंत विद्यालयाच्या नूतन इमारतीचा आज शिलान्यास

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १३ :** सारस्वत शिक्षण संस्था संचालित 'श्री वसंत विद्यालयाच्या नूतन इमारतीचा 'शिलान्यास सोहळा उद्या मंगळवार दि. १४ रोजी सकाळी होणार आहे.शिवानी एज्युकेशनल ट्रस्टचे संस्थापक तथा अध्यक्ष शिवशंकर अनंत मयेकर व वनिता मयेकर यांच्याहस्ते शाळेच्या शिलान्यास सोहळा होणार आहे. यावेळी रामनाथ ना. बुर्ये अध्यक्ष, सारस्वत शिक्षण संस्था, म्हापसा, पेश र. कामत, अनुप अ. वेर्लेकर, सुरज चोडणकर व इतर उपस्थित असणार.

### ॲड. शिवाजी देसाई यांना समाजरत्न पुरस्कार



**वाळपई : हडफडे येथेॲड शिवाजी देसाई यांना भारतीय समाजरत्न पुरस्कार प्रदान करताना पद्मश्री.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. १३ :** ब्रम्हा करमळी सत्तरीतील सुपुत्र ॲड. शिवाजी देसाई यांना ग्लोबल फाउंडेशन पुणेचा प्रतिष्ठित भारतीय समाजरत्न राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार पद्मश्री मुकेश बत्रा यांच्या हस्ते हडफडे येथील पंचतारांकित हॉटेल पार्क रेगिस सभागृहात प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षांपासून ॲड. देसाई हे सातत्याने सामाजिक क्षेत्रात अष्टपैलूरित्या योगदान देत आहेत. त्यांनी सत्तरी तालुक्यातील ऐतिहासिक नाणूस किल्याबाबत सातत्याने सत्तरी इतिहास संवर्धन समितीच्या माध्यमातून जनजागृती केली आहे. सूत्रसंचालन निशिकांत धुमाळ यांनी केले. ॲड देसाई यांनी अनेक पुरस्कार पटकावले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पुरस्काराचे श्रेय त्यांनी आपले आईवडील, गुरुजन, पत्नी, हितचिंतक, मित्र मैत्रिणी तसेच सत्तरी तालुक्याच्या जनतेला दिले आहे.

### पालये येथे पेडणे तालुका मर्यादित वेशभूषा स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १३ :** पालये येथील श्री लिंगेश्वर, पालये आयोजित पेडणे तालुका मर्यादित शालेय विद्यार्थ्यांसाठी शिव छपतीकालीन ऐतिहासिक व्यक्तिमत्वावर आधारित वेशभूषा स्पर्धा रविवार १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वा. श्री दत्त मंदिर देवस्थान,पालये सभागृहात होणार आहे. ही स्पर्धा मांद्रे मतदारसंघाचे आमदार तथा हाऊसिंग बोर्डाचे चेअरमन जीत आरोलकर यांनी पुरस्कृत केली आहे. स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथी व पाचवी ते दहावी अशा दोन गटात घेण्यात येईल. स्पर्धेत प्रत्येक गटातील विजेत्याना तीन रोख बक्षिसे व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येईल. अधिक माहितीसाठी सागर तिळवे (९८२३९३१२३६), प्रसाद परब (९९२३०३७४९९) वर संपर्क साधावा.

### वेद अक्टिव्हीटी सेंटरच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी




**कोरगाव : यशस्वी विद्यार्थी.** (मकबूल माळगीमनी )

■ टीम दैनिक हेराल्ड

**कोरगाव, दि. १३ :** पेडे – म्हापसा येथे पार पडलेल्या ॲरिथमेटिक स्पर्धेत पेडणे येथील वेद ॲक्टिव्हीटी सेंटरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत ग्रंथा भास्कर, विष्णू सावळ देसाई, यांना वेद परिपते याना चॅम्पियन्स चषक प्रथम, रिद्धी शेटये, विराट सातोस्कर, सौम्या सावंत, विहा सावळ देसाई यांना द्वितीय तसेच पियुष केरकर, शौर्य परब, ओम जाधव, साची साळगावकर, श्लोक नाईक, नव्या केरकर यांना तृतीय आणि विधी मालवणकर, समीक्षा जाधव, आर्य गवंडे यांनी उत्कृष्ट परफॉर्मन्स पदक पटकावले. पुणे येथे पार पडलेल्या १२ व्या राष्ट्रीय व ५ व्या आंतरराष्ट्रीय ॲबकस स्पर्धेत ग्रंथ भाईडकर, हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. देवांग जाधव, ग्रंथीक सावंत, अवनी परब, रूद्र नाईक या विद्यार्थ्यांनी चषक व प्रमाणपत्र मिळवत सन्मानास पात्र ठरले. या विद्यार्थ्यांना ॲबकस शिक्षिका योजना परिपत्ये यांनी पालक वर्ग यांचे आभार मानले.

# 'म्हादई' गोव्याकडेच ठेवा

## विद्यार्थ्यांचा 'म्हादई' समर्थनार्थ मूक मोर्चा | गोवा विद्यापीठ ते आझाद मैदानपर्यंत मोर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** स्टुडंट फॉर म्हादई, सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा या बॅनरखाली गोवा विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी म्हादई समर्थनार्थ आज जागृती मूक मोर्चा काढला. गोवा विद्यापीठ वाचनालय ते मिरामार मार्गे आझाद मैदान पणजीपर्यंत मोर्चा काढण्यात आला. शेकडो विद्यार्थ्यांनी वर्ग चूकवून मोर्चात सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांनी सरकारकडे कुठल्याही परिस्थितीत म्हादई गोव्याकडेच ठेवावी, अशी मागणी केली आहे. यावेळी विद्यार्थी म्हणाले की, गोव्यातील विद्यार्थ्यांमध्ये म्हादईसंदर्भात जागृती होणे महत्वाचे आहे. उच्च माध्यमिक विद्यालय आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही आपल्या भागात विद्यार्थ्यांना घेऊन अशाच प्रकारचे मोर्चे काढावे, असे आवाहनही विद्यार्थ्यांना करण्यात आले.

गोवा विद्यापीठ ते आझाद मैदान पणजी येथे चालत विद्यार्थ्यांनी मुकमोर्चा काढला आहे. राज्यातील विधिध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. राजकीय पक्षांची भूमिका व राजकारण विद्यार्थ्यांना नको आहे. तर विद्यार्थ्यांना म्हादई गोव्यात हवी.

राज्यातील विद्यार्थी म्हादईसंदर्भात गंभीर आहे, असा संदेश मूकमोर्चातून पोहोचणार आहे.




**पणजी : गोवा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सेव्ह म्हादई, सेव्ह गोवासाठी काढलेला मोर्चात सहभागी झालेले विद्यार्थी.**

### 'म्हादई'साठी जीवनदायीनी संस्थेचा पाठिंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३ :** गोव्याची जीवनदायीनी असलेल्या म्हादईचे पाणी वळविण्यास केंद्र सरकारने कर्नाटक सरकारला दिलेला (डी.पी.आर) ना हरकत दाखला मागे घ्यावा, अशी मागणी जीवनदायीनी–पेडणे संस्थेतर्फे करण्यात आली आहे.या संदर्भात संस्थेचे सचिव संजय राऊत यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात असे म्हटले आहे की, जीवनदायींनी बिगर राजकीय संस्था असून पेडणे तालुक्यातील जलसंवर्धन, पर्यावरण प्रदूषण आदी क्षेत्रात कार्यरत आहेत. गोव्यात उभ्या राहिलेल्या सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा या चळवळीला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. गोमंतकीय पर्यावरणवादी राजेंद्र केरकर, सौ. निर्मला सावंत यांनी उभारलेल्या म्हादई साठीच्या लढ्याला आमचा पाठिंबा राहील. गोव्याच्या जैवविविधतेचे रक्षण होण्यासाठी म्हादईचे रक्षण काळाची गरज असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## '...तोपर्यंत म्हादईसाठी ताटकळत राहावे लागणार'

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१३ :** केंद्र सरकार म्हादई नदीच्या पाण्यासंदर्भात कर्नाटकला झुकते माप देऊन गोवा राज्याला पाण्यासाठी फक्त आश्वासन देत आहे. सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत ही गोव्याच्या हाती खूप काही लागलेले नाही. मे महिन्यात कर्नाटकात विधानसभा निवडणूक होणार असून, त्यानंतर जुलै महिन्यात म्हादई संदर्भात पुढील सुनावणी होणार आहे. तोपर्यंत म्हादई नदीच्या पाण्यासारख्या महत्त्वाच्या ज्वलंत प्रश्नावर ताटकळत राहावे लागणार असल्याचे फातोर्डाचे आमदार तथा गोवा फॉरवर्ड पक्षाचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी दवंडे–फातोर्डा येथील आपल्या कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

केंद्र सरकारच्या जललवादाने कर्नाटकला म्हादई पाणी वळविण्यासाठी दिलेल्या डीपीआरची प्रतही केंद्र सरकार गोव्याला देऊ शकत नाही. त्यासाठी गोव्याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागते, यावरूनच लक्षात येते की, म्हादई नदीच्या पाण्यावर केंद्र सरकार कर्नाटकला झुकते माप देत आहे. म्हादई नदीच्या पाण्यासंदर्भात केंद्र सरकारच्या दरबारी गोव्याचे काहीच महत्त्व नाही. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी ट्विट केले आहे की, सर्वोच्च न्यायालयात म्हादई नदीच्या पाण्यासंदर्भातील लढ्यासाठी गोव्याची वाट मोकळी झाली आहे. तसे खूप मोठे काहीही झालेले नाही. मे महिन्यात कर्नाटकात विधानसभा निवडणूक होणार आहे. म्हादईसंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील पुढील सुनावणी जुलै महिन्यात होणार आहे. एकूण हे सर्व केंद्र सरकारने रचलेले नाटक असून, हे असेच होणार याची आपल्याला पुर्वीच माहिती होती.

पुढील सुनावणीपर्यंत गप्प बसावे लागणार असून, सभागृह समिती किंवा कुणाला ही म्हादईसंदर्भात विचारल्यास सर्वोच्च न्यायालयाकडे बोट दाखवून गप्प करणार असल्याचे आमदार विजय सरदेसाई म्हणाले.

## 'सेव्ह म्हादई', 'सेव्ह गोवा'ची पुढील दिशा लवकरच

▶ दीपप्रज्वलनाला भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल गोमंतकीयांचे आभार

▶ मडगाव पत्रकार परिषदेत समितीतर्फे माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१३ :** 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा' समितीने म्हादई नदी संवर्धनाची चळवळ पुढे नेण्यासाठी तसेच ही नदी अबाधित रहावी म्हणून रविवारी संध्याकाळी गोमंतकीयांना दीपप्रज्वलन करून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला गोमंतकीयांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा' समितीने गोमंतकीयांचे आभार मानले आहेत. यासंदर्भात पुढील दिशा ठरवण्यासाठी लवकरच 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा'च्या कोअर समितीची लवकरच बैठक होणार असून, त्यानंतर पुढील निर्णय जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आके, मडगाव येथील कोकणी भाषा मंडळाच्या विद्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.



**मडगाव : पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रतिमा कुतिन्हो, अँथनी डिसिल्वा, इम्तियाज शेख व विकास भगत.** (भास्कर देसाई)

यावेळी 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा'च्या प्रतिमा कुतिन्हो, विकास भगत, अँथनी डिसिल्वा व इम्तियाज शेख उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रतिमा कुतिन्हो यांनी सांगितले की, गोव्याची जीवनदायिनी असलेल्या म्हादई नदीच्या संवर्धनासाठी व त्यासाठी सुरू केलेल्या आंदोलनाला गोमंतकीयांचा पाठिंबा मिळावा, बळकटी मिळावी व सर्वांचे लक्ष वेधले जावे, यासाठी काल रविवारी संध्याकाळी सर्व गोमंतकीयांना 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा'तर्फे दीपप्रज्वलन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला गोमंतकीयांनी भरघोस प्रतिसाद देऊन दीपप्रज्वलन केले. गोव्यातच नव्हे तर विदेशात विविध ठिकाणी वास्तव्य करून असलेल्या गोमंतकीयांनीही उत्स्फूर्तपणे दीपप्रज्वलन करून सहभागी होऊन म्हादई नदीच्या संवर्धनासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शविला व आपलाही या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे दाखवून दिले. गोव्यात तर घरात दीपप्रज्वलन करून, मेणबत्ती पेटवून सर्व धर्मियांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग दर्शविला. घरातच नव्हे तर रेस्टारंट, हॉटेल्स, वाहने चालवताना जेथे कुठे असेल तेथे संध्याकाळी ७.३० वाजता थांबून मेणबत्ती पेटवून किंवा मोबाईलचा टॉर्च पेटवून आपला सहभाग दर्शविला. सासष्टी तालुक्यात तर या आंदोलनाला अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभला.

अँथनी डिसिल्वा यांनी सांगितले की, म्हादई नदीचे पाणी गोव्यात कायम वाहत रहावे, यासाठी 'सेव्ह म्हादई, सेव गोवा'तर्फे आंदोलन सुरू आहे. त्यासाठी काल दीपप्रज्वलन करण्याच्या आवाहनाला गोमंतकीयांनी दिलेला पाठिंबा पाहता, म्हादई नदी प्रती असलेल्या संवेदना लक्षात येतात. या आंदोलनाला भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत व यापुढेही असाच पाठिंबा मिळणार असल्याची अपेक्षा आहे. इम्तियाज शेख म्हणाले की, म्हादई नदीसाठी असलेल्या आंदोलनाला मुस्लिम समाजाचाही पाठिंबा आहे.

विकास भगत म्हणाले की, म्हादई नदीचा विषय सर्वोच्च न्यायालयात आला आहे. आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा'च्या कोअर समितीची बैठक होणार असून, त्यानंतर पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे.

## विद्याप्रबोधिनी महाविद्यालय 'विस्तारा २०२३' स्पर्धेत प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १३ :** गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालय आयोजित 'विस्तारा २०२३' या आंतर महाविद्यालय महा स्पर्धेत विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. गोव्यातील एकूण अकरा महाविद्यालयानी या स्पर्धेत भाग घेतला होता. यात गोवा अभियांत्रिकी महाविद्यालय यांना द्वितीय. 'विस्तारा २०२३' या अभिनव उपक्रमात एकूण ३० स्पर्धांचा समावेश होता.यातील सर्व स्पर्धांच्या गुणांमध्ये विद्याप्रबोधिनी महाविद्यालयाने अव्वल स्थान पटकावले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भूषण भावे यांनी सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना प्रा. धनश्री बालो व प्रा. कालिदास म्हामल यांचे मार्गदर्शन लाभले होते.



**पर्वरी : 'विस्तारा २०२३' स्पर्धेत अजिंक्यपद पटकावलेले विद्याप्रबोधिनीचे विद्यार्थी.** (शेखर वायंगणकर)

## विद्याभारती संस्कारमय शिक्षणाचे केंद्र

▶ नारायण देसाई

▶ भगतवाडा–आगोंद शिशुवाटिकेचे स्नेहसंमेलन

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १३ :** भारतीय शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले, त्याचे परिणाम आज आपण भोगत आहोत. मात्र परिस्थितीवर मात करत आज विद्याभारती सारखी संस्था संस्कारमय शिक्षणासाठी कार्यरत आहे. या शाळेतून शिक्षण घेणारे विद्यार्थी विविध क्षेत्रातील परिक्षेत नेत्रदीपक यश मिळवत आहेत. त्यामुळे मातृभाषेतून शिक्षणच आवश्यक आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक नारायण देसाई यांनी केले.

स्व.सौ.सरोजनी प्रभाकर ना.गावकर यांच्या स्मरणार्थ विद्याभारती संचालित श्री सरस्वती शिशुवाटिका (शेळेर) भगतवाडा, काणकोण शाळेचे स्नेहसंमेलन नुकतेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या चार–रस्ता सभागृहात आयोजित कार्यक्रमात देसाई बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे सहयोगी प्रा.व दक्षिण गोवा विद्याभारती सचिव आनंद देसाई, कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण देसाई, विद्याभारतीचे अध्यक्ष दिलखुश देसाई, विद्याभारतीचे पदाधिकारी सुरज भैरेली, शाबाजी नाईक, सौ.पावसकर, अरुणा शेट देसाई,पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ च्यारी व अन्य उपस्थित होते.




**आगोंद : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या चार–रस्ता येथील सभागृहात आयोजित स्नेहसंमेलनात बोलताना नारायण देसाई. बाजूला सिद्धार्थ च्यारी, शाबाजी नाईक, दिलखुश शेट, आनंद देसाई, सूरज भैरेली व अन्य.** (निराकार )




**आगोंद : शिशुवाटिकेच्या स्नेहसंमेलनात गायन करताना मुले.**

सुरवातीला महिला पालकांतर्फे स्वागत गीत सादर करण्यात आले. प्रमुख पाहुणे व अन्य मान्यवरातर्फे दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले. दिलखुश शेट यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिले.

आनंद देसाई यांनी विद्याभारती शिक्षकांचे कौतुक करून शिशुंचा सर्वांगीण विकास साधत असतात. प्रत्येक नागरिकाने अशा चांगल्या कामाला सहकार्य केले पाहिजे. व्यासपीठावरील मान्यवरांहस्ते विविध स्पर्धातील विजेत्यांना बक्षिस देण्यात आली. अध्यक्ष शेट व अन्य पदाधिकारी यांच्याहस्ते स्मृतीचिन्ह भेट देण्यात आली. सूत्रसंचालन व आभार शिक्षिका राजराणी पागी यांनी व्यक्त केले.

## राज्यात अनुसूचित जमातींना राजकीय आरक्षण द्यावे

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ युनायटेड ट्रायबल असोसिएशनची मागणी

▶ आरक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न करू : श्रीपाद नाईक

**पणजी, दि. १३ :** दिल्लीत असलेल्या 'मिशन पॉलिटिकल रिझर्वेशन फॉर शेड्युल्ड ट्राइब्स ऑफ गोवा'च्या शिष्टमंडळाने केंद्रीय पर्यटन आणि बंदरे, शिपिंग आणि जलमार्ग राज्यमंत्री तथा उत्तर गोवा खासदार श्रीपाद नाईक यांची भेट घेऊन गोव्यात आदिवासींना राजकीय आरक्षणाची मागणी केली आहे. युनायटेड ट्रायबल असोसिएशनने (उटा) पत्रकार परिषद घेऊन २०२७ पर्यंत ४० जागांपैकी ५ जागांचे आरक्षण मिळविण्यासाठी प्रयत्न करून आरक्षण नक्की करणार असल्याची खात्री अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी व्यक्त केली.

यावेळी सदस्य ॲड. जोआओ फर्नांडिस, रवींद्र वेळीप, रुपेश वेळीप, रामा काणकोणकर, जॉयसी डायस, गोविंद शिरोडकर आणि जोसेफ वाझ उपस्थित होते. मंत्री अर्जुन मुंडा यांनाही आरक्षणाचे निवेदन दिले असून गोव्यातील अनुसूचित जमातींसाठी राजकीय आरक्षणाची प्रलंबित मागणी त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

२००३ मध्ये गोव्यात गावडा, कुणबी आणि वेळीप समुदायांना गोव्यातील अनुसूचित जमातींची संख्या १२.५७ पर्यंत अधिसूचित करण्यात आली होती. परंतु गेल्या २० वर्षांपासून कोणतेही राजकीय आरक्षण दिले गेले नाही, असे दोन्ही मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.



**पणजी : केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांना निवेदन देताना उटाचे पदाधिकारी.**

गोव्यातील अनुसूचित जमातींना त्यांच्या राजकीय आरक्षणाच्या घटनात्मक अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. गोव्यातील अनुसूचित जमातींना राजकीय आरक्षण देण्यासाठी निवडणूक आयोगाला आवश्यक निर्देश देण्याची विनंती संघाने केली असून हा प्रलंबित असणारा प्रश्न सोडविण्याची विनंतीही शिष्टमंडळाने केली आहे.

गोव्यातील अनुसूचित जमातींना राजकीय आरक्षण देण्यासाठी लोकसभा किंवा राज्यसभेत विधेयक मंजूर करून किंवा भारतीय निवडणूक आयोग अधिसूचना क्रमांकाच्या ओळींमध्ये अधिसूचना जारी करावी, अशी विनंतीही शिष्टमंडळाने केली आहे. हा विषय संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडून गोव्यातील अनुसूचित जमातींना गोवा राज्यातील राजकीय आरक्षणाचा लाभ भारतीय राज्यघटनेनुसार मिळेल, याची खात्री श्रीपाद नाईक यांनी दिली आहे.


**PHOENIX TOWNSHIP LIMITED**
**CIN : L67190GA1993PLC001327**
**Regd :** Durga Bhavan, Hede Centre Tonca Panaji Goa Ga 403001 IN
**Corp Office:** Balaji Bhavan, 2nd Floor, 14 Best Marg, Colaba, Mumbai- 400001
**Authorised Capital:** 28,00,00,000 **Paid-up Capital:**21,68,086,80 **Email :** complaince@hbgindia.com

**UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 31.12.2022** (Rs. In Lacs)

| Particulars | 3 months ended 31.12.2022 (Un-Audited) | 9 Months Ended 31.12.2022 (Un-Audited) | Previous Year Ended 31.03.2022 (Audited) |
|---|---|---|---|
| Total Income from Operations(Net) | 793.804 | 1836.376 | 1587.88 |
| Net Profit/Loss from ordinary Activities after Tax | 13.415 | 74.540 | 28.656 |
| Net Profit/Loss for the period after Tax (after extraordinary Items) | 13.415 | 74.540 | 29.782 |
| Equity Share Capital | 1398.43 | 1398.43 | 1398.43 |
| Reserves(Excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of Previous Year) | 272.124 | 272.124 | 197.58 |
| Earning Per Share (before Extraordinary items) | 0.010 | 0.053 | 0.021 |
| Earning Per Share (after Extraordinary items) | 0.010 | 0.053 | 0.021 |

**Note:** The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the Stock Exchange websites. (URL of the filings)

**For Phoenix Township Limited**
**Sd/-**
**Samit Hede**
**Managing Director**
**DIN: 01411689**

**Place: Mumbai**
**Date: 13.02.2023**